Indian Streams Research Journal
Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011
ISSN:- 2230-7850 Available online at www.isrj.org

सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राच्या विकासातील सहकार चळवळीचे योगदान

प्रा. डॉ. डी.आर.बाड

सहयोगी प्राध्यापक , उमा महाविद्यालय पंढरपूर.

प्रास्ताविक –

भारत हा कृषी प्रधान देश असून एकूण लोकसंख्येपैकी सुमारे 70 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत आहे. भारतात सहकार चळवळीचा देखील ग्रामीण भागातच जन्म झाला आहे. 1904 मध्ये सहकार कायदा अस्तित्वात आला आणि निकोलसन यांच्या अहवालातील अनेक मुद्दे अंमलात आल्यानंतर सहकार चळवळ अधिक गतिमान झाली. सहकार चळवळीला एक शतकाहून अधिक वर्षाचा काळ कारणीभूत ठरला आहे.भारतातील सहकारी चळवळीत महाराष्ट्र राज्य नेहमीच प्रथम क्रमांकावर राहिले आहे. त्यावेळच्या मुंबई प्रांतात 1905 मध्ये धारवाड जिल्हयातील कणगीहाळ येथे पहिली शेती पतपुरवठा सहकारी संस्था स्थापन झाली. 1923 मध्ये ''बॉम्बे सेंट्रल को.ऑपरेटीव्ह बॅक'' सध्याची महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक मर्यादित मुंबई स्थापन झाली.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे प्रणेते –

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे प्रणेते म्हणून स्व.भाउसाहेब हिरे,स्व. विठठलराव विखे–पाटील, स्व.वैकुंठभाई मेहता, स्व.डी.आर.गाडगीळ, स्व. वसंतदादा पाटील अशा अनेक नररत्ने आहेत. कृषी औद्योगिक समाजाचे स्वप्न पाहणारे स्व.यशवंतराव चव्हाण एवढेच नव्हे तर कर्मवीर भाउराव पाटील यांनीही ''रयत सेवक को–ऑपरेटीव्ह सोसायटी'' स्थापन करून महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीला योग्य आकार दिला आहे. अशा प्रकारे उद्योग व्यवस्थापनात सर्वांचाच सहभाग, सामुदायिक जबाबदारीचे तत्व अशी सहकारी चळवळ भक्कम पायावर उभी राहिली. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ त्रिस्तरीय स्वरूपाची आहे. आज शेती सहकारी संस्था, श्रमिकांच्या सहकारी संस्था, शिक्षकांच्या सहकारी बॅक, खरेदी विक्री संघ, दूध संघ, नागरी सहकारी बॅका, विणकारांच्या सहकारी सोसायटया, गृहनिर्माण संस्था, विपणन, बिगर कृषी सहकारी संस्था, साखर कारखाने इ.क्षेत्रात सहकार चळवळीने गरूडझेप घेतली आहे. भारतातील महाराष्ट्र पहिला, सहकारी साखर कारखाना 1951 मध्ये प्रवरानगर लोणी जि. अहमदनगर येथे स्थापन झाला. महाराष्ट्राच्या उत्तुंग प्रगतीमध्ये सहकारी चळवळीचे फार मोठे योगदान असून भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा धक्का देण्याचे काम चळवळीने केले आहे. एकूणच महाराष्ट्रातील 35 जिल्हयातील सहकारातील मुंबई, कोकण, नाशिक,पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर या 9 प्रशासकीय विभागात सहकार क्षेत्राचे काम सुरू आहे.

भारतातील महाराष्ट्राची सहकार चळवळीची आघाडी –

भारतातील महाराष्ट्राची आघाडी आणि आघाडीवरचा महाराष्ट्र सहकार चळवळीमुळेच महाराष्ट्र भारतात नंबर वन आहे. ''कोकणातला हापूस आणि विदर्भातील कापूस'' आज आंतरराष्ट्रीय बाजारात मोठया प्रमाणावर शिरकाव करीत आहे. तर दुग्धजन्य पदार्थाच्या उत्पादनात जगात प्रथम क्रमांकावर असलेल्या भारत देशात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. एकूणच महाराष्ट्र राज्यातील 1961 पासूनची सहकारी चळवळीची प्रगती पाहिली तर नियोजनाद्वारे समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्याचा पायंडा पडलेला दिसून येतो. नविन आर्थिक धोरणातील जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या प्रक्रियेत महाराष्ट्रातील सहकार चळवळ टिकून राहिली आणि निकोप व नियोजनपूर्वक अशी सहकारी चळवळीची वाढ घडून येण्यास मदत झाली आहे.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची 2007 मधील परिस्थिती –

तक्ता क.1 महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची सद्यस्थिती

अ.नं.	संस्थांचा प्रकार	एकूण संख्या (सन 2007)
1	प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था	21184
2	प्राथमिक सहकारी बॅका	635
3	पगारदार नोकरांच्या पतसंस्था	7211
4	नागरी सहकारी पतसंस्था	18778
5	पणन (मध्यवर्ती व प्राथमिक)	1451
6	दुग्धसंस्था (मध्यवर्ती व प्राथमिक)	26127
7	स्हकारी गृहनिर्माण संस्था	70574
8	उपसा जलसिंचन संस्था	9407
9	श्रमिक सहकारी संस्था	10227
10	सहकारी साखर कारखाने	205
11	इतर प्राथमिक औद्योगिक संस्था	7218
12	मच्छीमार संस्था	2777
13	जंगल कामगार संस्था	299
14	हातमाग व यंत्रमाग विणकर संस्था	1845
15	इतर संस्था	22802
	एकूण	200740
आधार – महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात 2007, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे 44 वे प्रकाशन		

महाराष्ट्र राज्यातील सहकार चळवळ सर्वच क्षेत्रात व्यापक होत गेली. महाराष्ट्रातील सहकार चळवळीची दिशा व स्थिती अभ्यासताना शेती व शेतीवर आधारित असलेल्या उद्योग क्षेत्रात सहकार चळवळ अधिक गतिमान झाल्याचे दिसून येईल. सहकारी चळवळीची निकोप आणि नियोजनपूर्वक वाढ झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राच्या लोकसंख्येचे विश्लेषण व सहकार चळवळ –

सन 2001 च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 9,67,52,247 इतकी होती. त्यात पुरूषांची संख्या 5,03,34,270 (52.02 टक्के) आणि स्त्रियांची संख्या 4,64,17,977 (47.98 टक्के) इतकी होती. लोकसंख्येच्या बाबतीत भारतातील उत्तर प्रदेशानंतर दुस–या क्रमांकाचे राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख केला जातो. देशाच्या 9.42 टक्के लोकसंख्या महाराष्ट्र राज्यात राहत आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकासाच्या गेल्या 50 वर्षाचा आढावा घेतला तर सहकार चळवळीचे स्वरूप व विकास अधिक प्रगल्भ असल्याचे दिसते. परंतू 1981 ते 2000 या कालावधीचा विचार केला तर महाराष्ट्रातील प्राथमिक शेती सहकारी पतसंस्थेतील अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातींच्या लोकांचे प्रमाण त्यांना देण्यात येणारे कर्ज प्रमाण घटत असलेले दिसून येत आहे.

तक्ता क.2 प्राथमिक शेती पतसंस्था–अनुसूचित जाती/जमाती समावेश (रू.लाखात)

अ.नं.	बाब	1981	1991	2001	2007
1	सभासद	5391	7507	10121	11078
2	अनुसूचित जाती/ जमाती	1102	1474	1661	1627
3	शेकडा प्रमाण	20.44	19.41	16.41	14.69
4	कर्जदार / सभासद	1447	1908	3023	3137
5	कर्जदार अनुसूचित जाती/जमाती	206	194	269	407
6	टककेवारी	14.24	10.17	12.21	12.97
7	कर्जवाटप	24993	76855	373412	756817
8	अनुसूचित जाती/जमाती	1523	1938	15263	35295

9	टक्केवारी	6.09	2.52	4.09	6.12
आधार – तक्ता क्रमांक 1 प्रमाणे					

महाराष्ट्रातील प्राथमिक शेती पतसंस्थांतील अनुसूचित जाती/जमातीतील लोकांची संख्या घटत आहे. तसेच त्यांना दिली जाणारे कर्जवाटपाचे प्रमाणही काही अंशी घटल्याचे दिसून येते. फक्त 2001 ते 2007 मध्ये त्यात थोडीशी वाढ झाल्याचे दिसते.

थोडक्यात गेल्या 50 वर्षात महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती समाधानकारक असली तरी सहकारी चळवळीने अनुसूचित जाती/जमातींच्या लोकांना आपल्या कवेत सामावून घेण्यास पाहिजे तेवढी प्रगती केली नसल्याचे दिसते.

सारांश –

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ आणि तिच्या विकासाची भूमिका ही शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय विकासावरच अवलंबून आहे. सहकारी चळवळीतील, असमतोल दूर/कमी करणे, कोरडवाहू शेतीचा विकास घडवून आणणे, सहकारी शेतीचा अवलंब करणे, साखर कारखान्यांपुढील समस्या कमी करणे, शैक्षणिक व सामाजिक जाणीवा व सुविधा निर्माण करणे, सूतगिरण्या, दुग्धप्रक्रिया या क्षेत्रात आधुनिकीकरण घडवून आणणे, सहकारी बॅकांतील थकबाकीचे प्रमाण कमी करणे, सहकारी चळवळीत सुजाण नेतृत्वाचा विकास करणे, दुर्बल व मागास घटकांना सहकारी चळवळीचा परिघात मोठया प्रमाणावर सामावून घेणे अशाप्रकारे सहकारी चळवळींची दिशा ठरविल्यास व विकासाची मानसिकता आणि पारदर्शकपणा आणल्यास महाराष्ट्रातील सहकारी चळवळ सामाजिक चळवळ म्हणून ख–या अर्थाने बाळसे धरू शकेल याबाबत शंका घेण्याचे कारण नाही.

संदर्भ –

1. अर्थसंवाद
2. महाराष्ट्रातील जिल्हे – नवदीप पाचघरे प्रकाशन
3. स्पर्धा परिक्षा मासिक 2007
4. भारतीय आणि जगातील आर्थिक विकास– डॉ.मुकुंद महाजन
5. लोकराज्य – जुलै 2007
6. सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था– संपादक प्रा.जे.एफ.पाटील
7. भारतीय बॅक प्रणाली– डॉ. मुकुंद महाजन
8. दै.मुलनिवासी नायक, दैनिक सम्राट व इतर दैनिक वृत्तपत्रांचा आधार
9. महाराष्ट्र 2007 – डॉ.संतोष दास्ताने
10. लोकसंख्याशास्त्र – फडके प्रकाशन भोसले के.एम., काटे के.बी.
11. महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2008–2009